AC –
Item No. –

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| Syllabus for<br>Basket of OE | |
|---|---|
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG First Year Programme** | |
| **Semester** | **II** |
| **Title of Paper** | **Credits** |
| नाटक एक प्रयोगजीवी कला ४ (रंगवेशभूषा, प्रकाशयोजना व पार्श्वसंगीत) | **2** |
| **From the Academic Year** | **2024-25** |

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **Description the course :** | प्रथम वर्ष बी.ए. मराठी OPEN ELECTIVE या विषयासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दुसऱ्या सत्रात **नाटक एक प्रयोगजीवी कला- ४ अंतर्गत ' रंगवेशभूषा आणि प्रकाशयोजना व पार्श्वसंगीत'** ही अभ्यासपत्रिका नेमलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे आंतरविद्याशाखीय अभ्यास हे उद्दिष्ट समोर ठेऊन योजलेल्या या अभ्यास पत्रिकेद्वारे नाटक या प्रयोगजीवी कलेचे **रंगभूषा, वेशभूषा प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत'** हे घटक विस्ताराने परिचित करून देणे, येथे अभिप्रेत आहे. सदर अभ्यासक्रम दोन श्रेयांकनांसाठी योजला आहे.<br>'नाट्यशास्त्र'कार भरतमुनी यांनी अभिनयाचे जे चार प्रकार सांगितले त्यातील 'आहार्य अभिनय' म्हणजे पात्राच्या रंगभूषेचे-वेशभूषेचे अनुकरण करणे होय. जे पात्र नटांना वठवायचे असते त्या पात्रासारखे दिसण्याकरता नटास आवश्यक अशी रंगभूषा-वेशभूषा धारण करावी लागते. तसे करणे हे रस-परिपोषासाठी गरजेचे असते. नटांनी साकारलेल्या पात्रप्रतिमा त्यांच्या वाचिक, आंगिक अभिनयासह त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण रंगभूषा- वेशभूषेमुळे दीर्घकाळ रसिकांच्या स्मृतींत राहतात. नटांचे हे वैशिष्ट्यपूर्ण 'दिसणे' नाटकातील पात्रांचे स्वभावविशेष, सामाजिक स्थान, नैतिक धारणा यांना उठाव देणारे असते. त्यामुळे नाटकातील पात्रांच्या व एकूण नाट्यार्थाच्या योग्य आकलनासाठी नाटकाच्या या घटकांचे कार्य जाणून घेणे पूरक ठरते. तसेच नाटकातील प्रकाशयोजना आणि पार्श्वसंगीत या घटकांचे नाट्यप्रयोगातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रेक्षागृहातील रसिकांना रंगमंचावर काय दिसले पाहिजे, याचा खोलवरचा विचार दिग्दर्शक करतो. प्रकाशयोजनाकारांच्या सल्लामसलतीने नाट्याशयास पोषक अशी प्रकाशाची योजना आखतो. प्रकाशाची तीव्रता कमी अधिक करत, स्थळ,काळ, वेळ यांचे सूचन केले जाते, पात्रांच्या भावावस्था रसिकमनापर्यंत पोहोचवल्या जातात. शिवाय पार्श्वसंगीताची त्याला जोड लाभली की रंगमंचावर साकारणारे हे नाट्य अधिक अर्थपूर्ण, काव्यमय, परिणामकारक बनू लागते. रसिकमनावर नाटकाचा होणारा परिणाम हा या सर्व घटकांच्या सुमेळाचा परिपाक असतो, याविषयीचे भान अभ्यासकाला असावे लागते. म्हणून नाटकाच्या अभ्यासासाठी ' रंगभूषा-वेशभूषा आणि प्रकाशयोजना - पार्श्वसंगीत' या प्रयोगनिष्ठ घटकांचे कार्य व महत्त्व समजून घेणे आणि या रंगभूषादी क्षेत्रांत कलावंत, तंत्रज्ञ म्हणून स्वतंत्रपणे काम करता येते याची जाणीव करून देणे या दृष्टीने प्रथम वर्षाच्या दुसऱ्या सत्रात मराठी |


| | | |
|---|---|---|
| | | विषयाच्या OPEN ELECTIVE या स्तंभाखाली नाटक एक प्रयोगजीवी कला- ४ या अंतर्गत ‘रंगवेशभूषा आणि प्रकाशयोजना व पार्श्वसंगीत’ही अभ्यासपत्रिका नेमलेली आहे. सदर अभ्यासक्रमाची श्रेयांकन पद्धतीनुसार रचना करण्यात आलेली आहे.<br>सदर अभ्यासक्रम नाट्यसृष्टीशी जोडणारा आहे. |
| 2 | **Vertical :** | Open Elective |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit**: | 2 credits ( 1 credit = 15 Hours for Theory) |
| 5 | **Hours Allotted :** | 30 Hours |
| 6 | **Marks Allotted**: | 50 Marks |
| 7 | **Course Objectives**:<br>१. नाटकाच्या प्रयोगाशी संबंधित ‘रंगभूषा-वेशभूषा आणि प्रकाशयोजना -पार्श्वसंगीत’या घटकांचा परिचय करून देत या कलांविषयी कुतुहल जागृत करणे.<br>२. नाटकातील या घटकांचे महत्त्व आणि कार्य अभ्यासणे.<br>३. रंगभूषा-वेशभूषा, प्रकाशयोजना -पार्श्वसंगीत यांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमागे दिग्दर्शकाची मूल्यदृष्टी कार्यरत असते, याविषयीचे भान विकसित करणे.<br>४. नाट्यास्वादाची समज वृद्धिंगत करणे. | |
| 8 | **Course Outcomes**:<br>१. नाटकाच्या प्रयोगाशी संबंधित ‘रंगभूषा-वेशभूषा आणि प्रकाशयोजना -पार्श्वसंगीत’या घटकांचा परिचय करून देत या कलांविषयी कुतुहल जागृत होईल.<br>२. नाटकातील या घटकांचे महत्त्व आणि कार्य यांचे आकलन होईल.<br>३. रंगभूषा-वेशभूषा, प्रकाशयोजना -पार्श्वसंगीत यांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमागे दिग्दर्शकाची मूल्यदृष्टी कार्यरत असते, याविषयीचे भान विकसित होईल.<br>४. नाट्यास्वादाची समज वृद्धिंगत होईल. | |

| | |
|---|---|
| **9** | **Modules**:- |
| | **Module 1: घटक एक : रंगभूषा आणि वेशभूषा** या घटकांचा अभ्यास |
| | १. रंगभूषा - संकल्पना, रंगभूषेचे स्वरूपविशेष, महत्त्व व कार्य यांचा विविध उदाहरणांच्या आधारे परिचय.<br>२. वेशभूषा- संकल्पना, वेशभूषेचे स्वरूपविशेष, महत्त्व व कार्य यांचा विविध उदाहरणांच्या आधारे परिचय.<br>**(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका -श्रेयांकन -१)** |
| | **Module 2: घटक दोन : प्रकाशयोजना आणि पार्श्वसंगीत या घटकांचा अभ्यास** |
| | १.प्रकाशयोजना - संकल्पना, प्रकाशयोजनेचे स्वरूपविशेष महत्त्व व कार्य यांचा विविध उदाहरणांच्या आधारे परिचय.<br>२. पार्श्वसंगीत – संकल्पना, पार्श्वसंगीताचे स्वरूपविशेष, महत्त्व व कार्य यांचा विविध उदाहरणांच्या आधारे परिचय.<br>**(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका -श्रेयांकन -१)** |
| **10** | **Text Books:**<br>**NA** |

| | |
|---|---|
| **11** | **संदर्भसूची** :<br><br>१. भारतीय प्रयोगकलांचा परिचय व इतिहास- नाट्य- राजीव नाईक व प्रवीण भोळे<br>२. भाषण व नाट्यविषयक विचार -अशोक दा.रानडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.<br>३. रंगभूषा- प्रभाकर भावे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.<br>४. रंगभूषाकार आणि माणूस विक्रम गायकवाड – नीलिमा बोरवणकर, मनोविकास प्रकाशन.<br>५. लमाण -श्रीराम लागू<br>६. अभिनय साधना-के.ना.काळे (मूळ ग्रंथ-An actor prepares -Stanislavski)<br>७. भूमिकाशिल्प -के.ना.काळे (मूळ ग्रंथ -Building a Character- Stanislavski)<br>८. नाटकवाल्याचे प्रयोग – अतुल पेठे, मनोविकास प्रकाशन.<br>९. नाट्यनिर्मिती प्रक्रिया -दलपतसिंग येती गावा, संपादक-विनोद शिरसाठ, साधना प्रकाशन, पुणे.<br>१०.लागलेली नाटकं -राजीक नाईक, शब्द प्रकाशन, मुंबई.<br>११.ललित मासिक -नाट्य विशेषांक<br>१२.रंग नाटकाचे- पुष्पा भावे |

| | | |
|---|---|---|
| | १३. Drama: Text into Performer – Peter Reynolds<br>१४. प्रवीण भोळे यांच्या ब्लॉग वरील लेख रंगण (pradabho.blogspot.com)<br>रंगभूषा : मराठी विश्वकोश https://vishwakosh.marathi.gov.in/30906/<br>वेशभूषा: मराठी विश्वकोश<br>https://vishwakosh.marathi.gov.in/33024/ | |
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination Individual Passing in Internal and External Examination : 60%** |
| **13** | **Continuous Evaluation through:**<br>Quizzes, Class Tests, presentation, project, role play, creative writing, assignment etc.( at least 3 ) | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>चाचणी परीक्षा-लेखी/ऑनलाईन ,गृहपाठ ,<br>सादरीकरण - २० गुण |
| **14** | **Format of Question Paper:** for the final examination<br><br>बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br>एकूण तीन प्रश्न विचारावेत.<br><br>प्रत्येक घटकावर अंतर्गत पर्याय असलेले प्रत्येकी १० गुणांचे दोन प्रश्न विचारावेत.<br><br>तिसरा प्रश्न हा घटक १ आणि २ वर आधारित दहा गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. | |

Signatures of Team Members

| **Sr.No** | **Name** | **Signature** |
|---|---|---|
| **1.** | डॉ. सतीश कामत ( अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ) |  |
| **2.** | डॉ. अश्विनी तोरणे (समन्वयक, निमंत्रित विषयतज्ञ ) | |
| **3.** | डॉ. नीतिन आरेकर (सदस्य) | |
| **4.** | डॉ. शीतल पावसकर-भोसले (सदस्य) | |
| **5.** | प्रा. संजयकुमार इंगोले (सदस्य) | |
| **6.** | प्रा.ज्योती रोटे (निमंत्रित विषयतज्ञ ) | |